CMYK

बीड । सोमवार
२०.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २८४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955





## मला ठरवून टार्गेट केले जात आहे,पण...

# मी अभिमन्यु नाही, मी अर्जुन आहे-धनंजय मुंडे

**✻ स्व.संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फासावर लटकवा ✻ बीड म्हणजे बिहार आणि परळी म्हणजे तालिबान, अशी भयानक खोटी प्रतिमा तयार केली जात आहे? ✻ आम्ही ऊसतोड कामगार, वैद्यनाथांच्या परळीला आणि बीड जिल्ह्याला बदनाम करु नका ✻ कार्यकर्त्याला ताकत देताना विश्वास महत्त्वाचा, तरच संघटन मजबूत होईल ✻ पहाटेच्या शपथविधी पासून बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोख्याबाबत धनुभाऊंनी मनमोकळा संवाद साधला✻**



शिर्डी (प्रतिनिधी): - मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून अजितदादांच्या प्रत्येक निर्णयात ठामपणे सोबत उभा राहिलो. पक्षाच्या वाईट काळात वेगवेगळी आंदोलने, यात्रा आदींच्या माध्यमातून अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. मात्र आता बीड जिल्ह्यातील एका दुर्दैवी हत्या प्रकरणा आडून मला जाणीवपूर्वक ठरवून टार्गेट केले जात आहे. महायुतीतील नेत्यांकडूनच मला लक्ष्य केले जात आहे, याचेच जास्त वाईट वाटत आहे. पक्षातील काही लोक देखील दादांच्या कानाला लागून चुकीची माहिती देऊन दिशाभूल करत आहेत. मात्र तरीही माझी भूमिका व वस्तुस्थितीची जाणीव असल्याने या कठीण काळातही पक्ष म्हणून दादा माझ्या पाठीशी उभे आहेत. आज कुणी निराधार व बिनबुडाचे कितीही आरोप करून मला अडकवण्याचा, माझा अभिमन्यु करण्याचा प्रयत्न केला तरीही उपयोग होणार नाही, कारण मी अभिमन्यु नाही, मी अर्जुन आहे! अजित दादांनी आता बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले आहे, याचा आनंदच असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे. शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित नव संकल्प शिबिराच्या व्यासपीठावरून ▶▶पान २ वर

### बीड जिल्हा अन् सामाजिक सलोखा

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकारनानंतर झालेल्या मीडिया ट्रायल, सोशल मीडियावरील चिखलफेक, साधलेले राजकारण अशा अनेक गोष्टींनी जिल्ह्याचे सामाजिक ऐक्य धोक्यात आले आहे. आपला पक्ष शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे, त्यामुळे आता आमच्या बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारी सुद्धा सर्वांना घ्यावी लागेल. ऊसतोड करून, कष्ट करून, कोरडवाहू शेती करून जगणारे आम्ही सामान्य लोक आहोत. आमचा जिल्हा बिहार आणि आमची परळी तालिबान नाही. अशीच बदनामी सुरू राहिली तर पुढच्या महिन्यात महाशिवरात्री आहे, बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथ यांच्या दर्शनाला भाविक येतील का, अशी भीती वाटत असल्याचे सांगून परळीची बदनामी थांबवा असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.

# खाकीचं स्वप्न पाहणाऱ्या ३ तरूणांवर काळाचा घाला

## घोडकाराजुरी गावावर शोककळा



बीड, (प्रतिनिधी) :- बीड परळी रस्त्यावर बीड शहरापासून पाच किलोमीटर असलेल्या मोची पिंपळगाव फाट्यावर सकाळी ६ वाजता पोलीस भरती सराव आणि व्यायाम करण्यासाठी गेलेल्या घोडके राजुरी गावातीलच तीन युवकांना बसणे उडवले, या दोघेजण जागीच ठार झाले तर एक गंभीर जखमी झाल्याने त्याला बीड येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता उपचारादरम्यान मृत्यू झाला. राजुरी गावातील पाच विद्यार्थी हे सकाळी व्यायाम करण्यासाठी बीड परळी रस्त्यावर आले असता बस क्रमांक १४ १४७३ या बसणे तिघांना उडवले यात १)ओम सुग्रीव घोडके वय १९ वर्ष २) विराट बाब्रुवान घोडके वय १८ वर्ष ३) सुबोध बाबासाहेब मोरे वय १९ वर्ष सर्व रा.घोडके राजुरी याना बसणे उडवल्याने ओम घोडके विराट घोडके जागीच ठार झाले तर सुबोध मोरे हा जखमी असल्याने त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात आणले (पान २ वर)

### दुर्दैवी घटना अत्यंत दु:खदायक-आ.संदीप क्षीरसागर



## मृत तरुणांच्या कुटुंबियांना १० लक्ष रूपयांची मदत जाहीर

बीड तालुक्यातील घोडका राजुरी येथील पोलीस भरतीचा सराव करणार्या तीन तरूणांना एस.टी. बसने चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही दुर्दैवी घटना अत्यंत दु:खदायक असल्याची भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे. तसेच सदरील तरूण हे सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील असल्याने शासनाकडून ▶▶पान २ वर

# ...नाहीतर राज्य बंद समजायचं




मुंबई, (वृत्तसेवा):-बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरुन मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला मोठा इशारा दिला आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींना पकडून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. तसेच आपली ही मागणी मान्य झाली नाही तर राज्य बंद असं समजयाचं, असा मोठा इशाराच मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया देताना दिला आहे. ''आम्ही न्यायाच्या बाजूने आहोत, या राज्यात आज चित्र-विचित्र बघण्याची वेळ आली आहे. वाईट चित्र पाहण्याची वेळ मंत्री धनंजय मुंडेंच्या टोळीने आणली आहे. लोक आता सोडून द्या म्हणून आरोपीच्या बाजूने उभे राहणार. त्यांनी पाप झाकण्यासाठी वाईट वळण लावलं आहे. खंडणी आणि हत्येतील आरोपी एकच आहेत'', असं मनोज जरांगे ▶▶पान २ वर



# जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला ७ महिन्यांपासून टाळे

### गर्भवती महिला, बाह्यरुग्ण आणि नातेवाईकांनी नैसर्गिक विधीसाठी जायचे कुठे ?-डॉ.गणेश ढवळे

बीड, (प्रतिनिधी):-बीड जिल्हा रूग्णालयाच्या आवारात असलेल्या सार्वजनिक स्वच्छता गृहाला ७ महिन्यांपासून टाळे लागले असून सोनोग्राफी ताटकळत असलेल्या गर्भवती महिला तसेच जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल रूग्णांना भेटण्यासाठी आलेले नातेवाईक तसेच बाह्यरुग्ण विभागात तपासणीसाठी व उपचारासाठी आलेले आणि अपघाती रूग्णांसोबत येणारे नातेवाईक असा जिल्हा रुग्णालयात रोज ▶▶पान २ वर

# सय्यद नजिब अमीर साहब यांना निरोप देण्यासाठी जनसमुदाय लोटला

### मासुम कॉलनी कब्रस्तानात दफनविधी



बीड, (प्रतिनिधी) :- बीड शहरातील कारंजा भागातील रहिवासी असलेले सय्यद नजीब सय्यद मासूम सहाब ( अमीर सहाब) हे गेल्या काही वर्षांपासून आजारी होते. त्यांच्यावर बीड शहरातील काकू -नाना हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. उपचारादरम्यान शनिवारी रोजी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते. बीड जिल्ह्याच्या तबलीग जमातचे प्रमुख म्हणून ते कार्यरत होते. ▶▶पान २ वर


# जे आम्हाला दिसतंय ते त्यांना दिसेना

### आमदार प्रकाश सोळंके बेधडक बोलले



शिर्डी (अहमदनगर), (वृत्तसेवा) :- धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात कायम ठेवले असले तरी त्यांच्याकडे कोणत्याही जिल्ह्याचे पालकत्व न देण्याचा निर्णय मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतल्यानंतर त्यांच्या निर्णयाचे समर्थन राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके यांनी केले आहे. धनंजय मुंडे यांना पालकमंत्रिपद दिले नाही, हे बरे झाले. बीड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद अजित पवार यांनी स्वीकारले, याबद्दल आनंद आहे. परंतु धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदावरही नेतृत्वाने ▶▶पान २ वर

# लाडक्या बहिणींसाठी खुशखबर, अजितदादांची मोठी घोषणा




मुंबई, (वृत्तसेवा):-अल्प उत्पन्न गटातील महिलांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशानं सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत ज्या कुटुंबांचं उत्तन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, त्या कुटुंबातील महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. या योजनेची अंमलबजावणी गेल्या वर्षी जुलै महिन्यापासून करण्यात आली आहे. आतापर्यंत या योजनेंतर्गत महिलांच्या बँक खात्यात जुलै ते डिसेंबर असे सहा हप्ते जमा करण्यात आले आहेत. आता जानेवारीचा हप्ता कधी मिळणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. तसेच जर पुन्हा एकदा राज्यात आमचं सरकार आलं तर आम्ही लाडक्या बहिणींना दीड हजार रुपये नाही तर २१०० रुपये देऊ असं आश्वासन महायुतीनं विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी दिलं होतं. महायुतीला विधानसभा निवडणुकीत मोठं यश मिळालं, त्यामध्ये सर्वात मोठा वाटा हा लाडक्या बहिणींचा असल्याचं बोललं जात आहे. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं आहे. त्यामुळे आता २१०० रुपये कधीपासून मिळणार याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. दरम्यान जानेवारीचे पैसे महिलांच्या खात्यात कधी जमा होणार याबाबत आता अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडून मोठी अपडेट देण्यात आली आहे. ✻ नेमकं काय म्हणाले अजित पवार? : माझी लाडकी बहीण योजना कोणत्याही ▶▶पान २ वर




CMYK

# राखावी बाबूंची अंतरे...



जात, धर्म, राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम, विचारधारा वगैरे हवा तापवायला ठीक. पण हल्ली कोणतीही निवडणूक मतदारांना आर्थिक लाभ दिल्याशिवाय जिंकता येत नाही हे लोकसभा, त्यापाठोपाठ झालेल्या महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड विधानसभा निवडणुकांच्या निकालांवरून स्पष्ट झालेलेच आहे. तेव्हा दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर केंद्र सरकार जादूगाराप्रमाणे टोपीतून एखादा ससा काढणार ही अपेक्षा होतीच. ती फोल ठरली नाही. कारण केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याची नरेंद्र मोदी सरकारची घोषणा. भले पंतप्रधानांनी कधी काळी रेवडी संस्कृतीची खिल्ली उडवली असेल. पण तो इतरांना द्यावयाच्या उपदेशाचा भाग झाला. लोकांना सांगायचे ब्रह्मज्ञान आपण थोडेच पाळायचे असते! त्यामुळे दिल्लीतले चार लाख सरकारी कर्मचारी एका झटक्यात या वेतन आयोग घोषणेने खूश होणार असतील तर ते योग्यच म्हणायचे. दिल्ली काबीज करायचीच या निर्धाराने उतरलेल्या भाजपने आठवा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा करून दिल्लीतील सरकारी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांची मते मिळतील, असा प्रयत्न केल्याचा आरोप होईल. होऊ द्या! वास्तविक प्रथेनुसार २०२६ साली नवा वेतन आयोग येणे अपेक्षित आहेच. पण दिल्ली विधानसभा निवडणुका २०२५ साली आहेत त्याला बिचारे केंद्र सरकार तरी काय करणार? खरे तर दिल्ली विधानसभा निवडणुका ऐन भरात आलेल्या असल्याने अशी घोषणा हा आचारसंहिता भंग असल्याची किरकिर आता काही करतील. करू द्यात! अशा किरकिऱ्यांच्या तक्रारींकडे कसे दुर्लक्ष करावे याचा पुरेसा सराव आयोगाला आहे. शेवटी आयोगही माणसांचा ना. त्यांनाही पोट असते, निवृत्तीनंतरच्या नेमणुका असतात. तेव्हा निवडणुकीत विजय सलामत तो आरोप पचास हे सत्य महत्त्वाचे. असो. तर सरकारी कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचवावे तसेच त्यांची क्रयशक्ती वाढावी या दुहेरी उद्देशाने वेतन आयोगाच्या माध्यमातून सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन रचनेत सुधारणा केली जाते. या आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीचा सुमारे ४९ लाख कर्मचारी तसेच ६५ लाख निवृत्तिवेतनधारक अशा एक कोटीपेक्षा अधिक आजी-माजी कर्मचाऱ्यांचा फायदा होईल. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी नवीन वेतन आयोगाची घोषणा होताच लगोलग राज्य सरकारी कर्मचाऱ्यांकडून वेतनात वाढ करण्याची मागणी पुढे येते. तशी ती आली. आणि मग राज्याराज्यांमधील सत्ताधाऱ्यांनाही नवा आयोग लागू करण्याशिवाय पर्याय नसतो. केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची मोठी मतपेढी असल्याने कोणत्याही सत्ताधाऱ्यांना या वर्गाला नाराज करता येत नाही. भले मग वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करताना केंद्र आणि सर्वच राज्यांची तिजोरी आटली हे कितीही खरे का असेना! सध्या लागू असलेल्या सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर केंद्र सरकारच्या खर्चात २०१६ नंतर वार्षिक एक लाख कोटींनी वाढ झाली. हा खर्च नंतर वाढतच गेला. आठव्या वेतन आयोगाचा भार यापेक्षाही अधिक असेल. पूर्वी १९९४ मध्ये लागू झालेल्या पाचव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीपासून केंद्र व राज्यांचे आर्थिक कंबरडे पार मोडले. विशेषत: राज्ये आर्थिकदृष्ट्या अडचणीत आली आणि त्यातून अद्यापही बाहेर आलेली नाहीत. महाराष्ट्रासारख्या आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्याला त्या वेळी मोठा फटका बसला. कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी पैसे हातउसने घेण्याची वेळ महाराष्ट्रासारख्या श्रीमंत राज्यावर त्यामुळे आली. इतकेच काय पण मंत्रालयातील सहकार सचिवांच्या खुर्चीवर त्या वेळी देणी थकवल्याबद्दल जप्तीही आली. या पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर देशातील एकूणच महसुली खर्चात वाढ झाली; पण त्याच वेळी भांडवली म्हणजेच विकासकामांवरील खर्च कमी झाला, असा निष्कर्ष १५व्या वित्त आयोगाने काढलेला आहे. म्हणजे असे की सरकारने जनतेसाठी करावयाच्या कामांवर खर्च करण्याऐवजी सरकारला आपला गाडा चालवण्यासाठी- म्हणजे कर्मचाऱ्यांच्या वेतनावर आणि निवृत्तांच्या निवृत्तिवेतनावर- अधिक खर्च करावा लागतो. केंद्राच्या एकूण महसुली उत्पन्नाच्या २१.५ टक्क्यांवर १९९५-९६ मध्ये असलेला भांडवली खर्च २०१६ मध्ये १४ टक्क्यांपर्यंत घटला होता. सरकारच्या तिजोरीत जमा होणाऱ्या प्रत्येक १०० रुपयांतले साठभर रुपये या वेतन/ निवृत्तिवेतनावरच खर्च होतात. राहिलेल्या ४० टक्क्यांत जनतेचे काय ते कल्याण करायचे, हे आव्हान. परत लाडक्या बहिणी, कर्जमाफ्या वगैरे आहेतच. खरे तर वेतन वाढवताना सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामाचा उरकही वाढेल अशी अपेक्षा करणे काही गैर नाही. आतापर्यंत अनेक वेतन आयोगांनी खासगी क्षेत्राप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांनाही कामगिरी आधारित वेतनवाढ, पदोन्नती दिली जावी असे काही सुचवलेले आहे. खासगी क्षेत्रात ज्याप्रमाणे दरवर्षी प्रत्येक कर्मचाऱ्याच्या कामगिरीचे मूल्यमापन होते, तसे सरकारी क्षेत्रातही करा असे सांगून/ सुचवून तज्ज्ञ थकले. खासगी क्षेत्रात कर्मचारी हे व्यवस्थापनाला उत्तरदायी असतात. प्रत्येक कर्मचाऱ्याच्या कामाचे मूल्यमापन केले जाते. याउलट केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये आनंदीआनंदच! थंडी जास्त आहे म्हणून राजधानी दिल्लीत सरकारी कर्मचारी दुपारी १२ पर्यंत ऊन खात बसलेले आजही आढळतात. या अशा सर्वांना सरसकट वेतन आयोगामुळे आपोआप वाढीव वेतन मिळणार. या वाढत्या वेतनाची हमी असल्याने कोण कशाला करेल चोख काम! तरी बरे केंद्र सरकारमध्ये जवळपास १० लाख पदे अद्यापही रिक्त आहेत. तशी माहिती संसदेत देण्यात आली होती. म्हणजे यापैकी काही पदे भरायची झाल्यास आस्थापना खर्च आणखी वाढणार. हे अर्थव्यवस्थेसाठी चांगलेच म्हणायचे. त्याच वेळी निवृत्तिवेतनधारकांची वाढती संख्या लक्षात घेता सरकारी तिजोरीवरील ताण कमी करण्याकरिता सुमारे २० वर्षांपूर्वी नवीन निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली. पण या योजनेत दरमहा ठरावीक निश्चित रक्कम मिळत नाही, अशी कर्मचाऱ्यांची तक्रार होती. जुनी निवृत्तिवेतन योजना पुन्हा लागू करावी या मागणीने जोर धरला. विरोधकांची सत्ता असलेल्या काही राज्यांमध्ये जुनी योजना पुन्हा लागू करण्यात आल्यावर मोदी सरकारचाही नाइलाज झाला. शेवटी सुधारित निवृत्तिवेतन योजना गेल्या वर्षी लागू करण्यात आली आणि त्यातून निवृत्त कर्मचाऱ्यांना अखेरच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम मिळण्याची हमी देण्यात आली. या निर्णयाने सरकारवरील वार्षिक बोजा सुमारे १० हजार कोटींनी वाढला. वाढू द्या! तो सहन करायला 'देश की एकसो चालीस क्रोर' जनतेचे खांदे मजबूत आहेत. शेवटी असंघटित जनता महत्त्वाची की संघटित कर्मचारी, हा गंभीर प्रश्न सरकारसमोर आहेच. त्याचे उत्तर संघटित कर्मचारी अधिक महत्त्वाचा असे असेल हे कळायला अर्थतज्ज्ञ थोडीच असायला हवे? परत या संघटित कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतन-सुविधांमुळे सरकारी नोकरीचे आकर्षण अधिक वाढते हा फायदादेखील लक्षात घ्यायला हवा. त्यामुळे विद्यार्थीगण दहा-दहा वर्षे एमपीएससी, यूपीएससी परीक्षा देत बसतात हा फायदा तर केवढा महत्त्वाचा. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा पाया अशा निरंतर शिक्षणामुळे तर पक्का होतो. इतक्या साऱ्या सकारात्मक विचारानंतरच सरकारने हा आठव्या वेतन आयोगाचा निर्णय घेतला असणार! शेवटी 'राखावी बाबूंची अंतरे । भाग्य येते तदनंतरे' हे खरे नव्हे असे कोण म्हणेल?

# महाकुंभ मेळ्यात सिलिंडर स्फोटामुळे १८ तंबूमध्ये भीषण अग्नीतांडव



उत्तर प्रदेश, (वृत्तसेवा):-उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित करण्यात आलेल्या महाकुंभ मेळ्याला भीषण आग लागली आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्याकरता अग्नीशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या आहेत. या आगीचे लोट दूरहून दिसत आहेत. दरम्यान, घटनास्थळी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ पोहोचले असून ते घटनेची चौकशी करत आहेत. प्राथमिक अहवालांनुसार, कॅम्प साइटवर आग लागली आणि त्या भागात बसवलेल्या अनेक तंबूंना या आगीने वेढले. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल () चे एक पथकही घटनास्थळी दाखल झाले आहे. आग विझवण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलीस आणि अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. या आगीत १८ तंबूंना आग लागली आहे. उत्तर प्रदेशचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रमोद शर्मा इंडियन एक्स्प्रेसला म्हणाले, महाकुंभमध्ये सिलिंडरच्या स्फोटामुळे आग लागली आहे. तर, प्रयागराज झोनचे एडीजी भानू भास्कर इंडिया टुडेला म्हणाले, महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १९ मध्ये दोन-तीन सिलिंडरचा स्फोट झला. त्यामुळे कॅम्पमध्ये मोठी आग लागली. आगीवर नियंत्रण मिळण्यात आले आहे. सर्व लोक सुरक्षित आहेत आणि कोणीही जखमी झालेले नाही. महाकुंभ २०२५ च्या अधिकृत हँडलने पोस्ट केले, ''खूप दुःखद! महाकुंभला लागलेल्या आगीच्या घटनेने सर्वांनाच धक्का बसला आहे. प्रशासन तात्काळ मदत आणि बचाव कार्य करत आहे. आम्ही सर्वांच्या सुरक्षिततेसाठी माँ गंगाकडे प्रार्थना करतो. या पोस्टमध्ये बाधित भागातून काळ्या धुराचे दाट लोट उठत असलेला व्हिडिओ देखील शेअर करण्यात आला आहे. ''महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १९ मध्ये दोन सिलिंडरचा स्फोट होऊन शिबिरांमध्ये मोठी आग लागली. अग्निशमन दलाचे जवान आग विझवण्याचा प्रयत्न करत आहेत'', असे आखाडा पोलिस स्टेशनचे प्रभारी भास्कर मिश्रा यांनी सांगितले.

# सैफ अली खानवर जीवघेणा हल्ला, मुख्य आरोपीला ५ दिवसांची पोलिस कोठडी



मुंबई, (वृत्तसेवा) :- सध्या देशभरात सैफ अली खान हल्ला प्रकरण चांगलंच गाजतंय. या प्रकरणात दररोज कोणते ना कोणते अपडेट्स समोर येत आहेत. गेल्या चार दिवसांपासून पोलिस या प्रकरणाची कसून तपास करत असून आता पर्यंत ५० हून अधिक लोकांची चौकशी केली आहे. शनिवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास ठाण्याहून एकाला अटक केली आहे. मुंबई पोलीस सैफचा हल्लेखोर पकडण्यात यशस्वी झाले आहेत. त्यांनी सैफच्या मुख्य आरोपीला ताब्यात घेतलं आहे. मुंबई पोलिसांनी आज सकाळी ९ वाजता पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत मुंबई पोलिस खुलासे केले. रात्री २ वाजण्याच्या सुमारास आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीला पकडण्यासाठी सुमारे १०० अधिकाऱ्यांची एक टीम तयार करण्यात आली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सैफवर हल्ला करणाऱ्या आरोपीचं नाव मोहम्मद शरीफउल इस्लाम शहजाद (वय ३०) आहे. हा आरोपी बांग्लादेशी ओरीजनचा आहे. सैफवर हल्ला करणाऱ्या आरोपीचं नाव मोहम्मद शरीफउल इस्लाम शहजाद (वय ३०) आहे. आरोपी नाव बदलून पोलिसांना चकमा देत होता. मात्र त्याच्याकडे भारतीय असल्याचे कुठलीच कागदपत्रे नाहीत. त्यामुळे पोलिसांना संशय आहे की तो बांगलादेशी असावा. अद्याप याविषयी काही स्पष्टता नसून चौकशी सुरू आहे. अटकेनंतर आता हल्लेखोरालाही न्यायालयात हजर केले जाणार असून, सध्या रुग्णालयात दाखल असलेल्या सैफ अली खानचाही जबाब पोलीस नोंदवणार आहेत. दरम्यान, या आरोपीला पाच दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली असून पोलिसांनी आरोपीला १४ दिवसांची कोठडी देण्याची मागणी केली आहे.

पान १ वरून

## मला ठरवून टार्गेट...

ते बोलत होते. बीड जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात झालेली स्व.संतोष देशमुख यांची हत्या ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक होती. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फासावरच लटकवले पाहिजे, हे माझे पहिल्या दिवसापासून स्पष्ट मत आहे. गुन्हेगारी ही एक नीच वृत्ती आहे, त्याला जात धर्म नसतो. मात्र या घटनेच्या आडून जात म्हणून एका समाजाला जाणीवपूर्वक गुन्हेगार ठरवले जात आहे. सातत्याने आमची मीडिया ट्रायल केली जात आहे, याबद्दल धनंजय मुंडे यांनी खंत व्यक्त केली. ✻ तुमच्या अंगावर कोणी आले तर त्याला आम्ही शिंगावर घेतले : पक्षात आल्यापासून आजवरच्या वाटचालीत आमचे नेते म्हणून आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहिलो. अनेक प्रसंगी अजितदादांना खलनायक ठरवण्याचा प्रयत्न झाला. तुमच्या अंगावर कोणी आले तर त्याला आम्ही शिंगावर घेतले. २०१४ - १९ या काळात विरोधी पक्षनेतेपदी काम केले. पक्षाच्या पडत्या काळात चार वेळा हल्लाबोल, परिवर्तन, शिवस्वराज्य यात्रांमध्ये सहभागी होऊन सबंध महाराष्ट्र पिंजून काढला. तत्कालीन सरकारला वाकवायचे काम केले. २०१९ साली पहाटेची शपथ घेऊ नका हे मी सांगितले होते. ती शपथ त्यांनी घेतली पण शिक्षा मात्र मला मिळाली, अशी खंतही धनंजय मुंडे यांनी आज प्रथमच बोलून दाखवली. सामाजिक न्याय मंत्री म्हणून मी चांगले काम करून दाखवले. गाव - वस्त्यांची जाती वाचक नावे बदलणे, ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ यांसारखे अनेक क्रांतिकारी निर्णय त्याकाळात घेतले. ११ हजार कोटी रुपये पीकविमा एका वर्षात मिळवून देणारा कृषिमंत्री मी, मात्र त्यावरूनही टीका झाली. मात्र अर्धवट माहिती देऊन बदनामी करणारे लोक यावर बोलत नाहीत, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. ✻ खरे दुखणे : लोकसभा निवडणुकीमध्ये अनेक ठिकाणी युतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मी गेलो होतो. त्यावेळी बारामती लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा वहिनींच्या प्रचारासाठी जाऊ नकोस अन्यथा पुढे विधानसभेत त्याचा तुला त्रास होईल, असा सल्ला मला अनेकांनी दिला होता. मात्र तरीही मी गेलो. माझ्यासह अनेकांना विधानसभा निवडणुकीत ठरवून टार्गेट केले गेले. मी माझ्या परळीच्या जनतेच्या आशीर्वादाने एक लाख चाळीस हजार मतांच्या लिडने निवडून आलो, त्याचीच पोटदुखी अनेकांना प्रकर्षाने झाली. ठाण्यात मी पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचाराला गेलो म्हणून तिथले नेते बीडमध्ये येऊन मला टार्गेट करत आहे, हेही उघड झाले. विधानसभा निवडणुकीत मी केवळ ५ दिवस पूर्णवेळ परळीत होतो, उर्वरित वेळेत मी पक्षाच्या अनेक उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या, बैठका घेतल्या. त्यातील बहुतांश उमेदवार निवडून आले, असेही मुंडे पुढे बोलताना म्हणाले. ✻ मी काम करणारा कार्यकर्ता : मी सतत काम करणारा एक कार्यकर्ता आहे, नेता फक्त नावाला आहे. माझ्यातला कार्यकर्ता कधीच मरणार नाही. मी एक निष्ठावान कार्यकर्ता आहे, पक्ष नेतृत्वाने पाँडिचेरी मध्ये जाऊन पक्ष विस्ताराचे काम कर म्हंटले तर तिथे जाऊन मी काम करेल. पक्षाला सुद्धा कार्यकर्ताभिमुख व्हावे लागेल. कार्यकर्त्याला ताकत देताना संपूर्ण विश्वास देखील ठेवणे आवश्यक आहे, तेव्हाच पक्ष संघटना मजबूत होईल. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये पक्षाचा कार्यकर्ता कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.

पान १ वरून

## खाकीचं स्वप्न पाहणाऱ्या...

असता उपचारादरम्यान याचा देखील मृत्यू झाल्याचे समजते. हा अपघात एवढा भीषण होता की रस्त्यावर रक्त, मांसाचा सडा पडला होता. बस काही अंतरावर जाऊन रस्त्याच्या बाजूला असलेल्या खड्ड्यात गेली. या अपघातामुळे घोडकाराजुरी गावावर शोककळा पसरली असून घोडका राजुरी गावातील नागरिकांची बीड शासकीय रुग्णालयात गर्दी झाली होती. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात तरूणांचा कल हा पोलीस आणि सैन्य भरतीकडे असतो. त्यामुळे महा विद्यालयापासूनच मुलं भरतीच्या सरावाची घरीच तयारी सुरू करतात. रनिंगसाठी रोडवरच ग्रुपने जातात आणि एकत्र व्यायामही करतात. मात्र बीडच्या तीन तरूणांचं खाकीचं स्वप्न अधुक राहिलं. या अपघातामध्ये तरूण मुलांचा जीव गेल्याने जिल्ह्यामध्ये शोककळा पसरली आहे. दरम्यान, याआधी अनेकवेळा अशा घटना समोर आल्या आहेत. भरतीच्या सरावासाठी रस्त्यावरून धावत असताना अपघात झाल्याने अनेक युवकांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे तरूणांनी सराव करताना शक्यतो रस्त्यावर न धावता मैदानात धावण्याचा सराव केला पाहिजे. जेणेकरून रस्ते अपघातामध्ये कोणाची जीव जाणार नाही.

## दुर्दैवी घटना अत्यंत...

त्यांच्या कुटुंबीयांना मदत व्हावी अशी मागणीही घोडका राजुरी ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक व मतदारसंघाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. त्यानुसार मंत्री महोदयांनी प्रत्येकी १० लक्ष रूपये इतकी मदत कुटुंबियांना जाहीर केली आहे. घोडका राजुरी येथील पोलीस भरतीची तयारी करणारे ५ तरूण नेहमी प्रमाणे रविवारी (दि.५) रोजी सकाळी सराव करत असताना अचानक एस.टी. महामंडळाची बीड येथून परभणीकडे निघालेल्या बसने व्यायाम करत असणार्या या तरुणांना चिरडले त्यापैकी २ तरूणांनी बचावात उडी मारल्याने ते जखमी झाले परंतु त्यातील ३ तरूण सुबोध बाबासाहेब मोरे (वय २०), विराट बब्रूवान घोडके (वय १९), ओम सुग्रीव घोडके (वय २०) हे जागीच ठार झाले. पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत करणारे हे युवक अत्यंत सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील होते. त्यामुळे घोडा राजुरी येथील ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक यांनी मृतांच्या कुटुंबाला आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी केली होती. त्यानुसार आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना या घटनेची माहिती देऊन या अपघातातील मृत झालेल्या तरूणांच्या कुटुंबियांना मदतीची मागणी केली होती. त्यानुसार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मृत्यू झालेल्या तीन्ही तरूणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लक्ष रूपयांची मदत जाहीर केली आहे. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून मी या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी तर आहेच परंतु या कुटुंबियांच्या घरातील सदस्य म्हणून मी यापुढे त्यांच्या सुखःदुखात कायम असेल. तसेच शासनाने जाहीर केलेली मदत कुटुंबियांना मिळेपर्यंत पाठपुरावा करणार आहे यासोबतच ग्रामस्थ व नातेवाईक यांच्या मागणीनुसार कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्याबातही शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.

## ...नाहीतर राज्य...

पाटील म्हणाले. ''तपास यंत्रणा सध्या चांगलं काम करत आहे. एक आरोपी

पान १ वरून

सुटला तर राज्यभर आम्ही आंदोलनाच्या पावित्र्यात येणार आहोत. सध्या तरी मुख्यमंत्र्यांच्या शब्दावर मराठे शांत आहेत. सध्या तरी सरकार गांभीर्याने घेतंय, पुढे पुढे बघू'', असं मनोज जरांगे म्हणाले.

## सय्यद नजिब अमीर...

रविवारी सकाळी ११ वाजता मोमीनपुरा भागातील बायपास रोडच्या मैदानावर नमाज ए जनाजा झाली. यानंतर मासुम कॉलनी परिसरातील कब्रस्तानात दफनविधी झाला. यावेळी बीड जिल्हा सह विविध जिल्ह्यातील मुस्लिम बांधव उपस्थित होते. या नमाज ए जनाजा साठी हजारोच्या संख्यांनी लोकांची उपस्थिती होती. नजीब भाई अमिरसहाब यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

## जे आम्हाला दिसतंय...

विचार करावा, असा सल्ला देत बीड प्रकरणामुळे मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बदनामी होत आहे, असे निसंकोचपणे सोळंके यांनी सांगितले. धनंजय मुंडे यांना पालकमंत्रिपद नाकारल्यानंतर आणि बीडचे पालकत्व अजित पवार यांनी स्वीकारल्यानंतर आमदार प्रकाश सोळंके यांनी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी बीडमधली भीषण सामाजिक आणि राजकीय अवस्था विषद केली. धनंजय मुंडे यांच्याकडे सातत्याने बीडचे पालकमंत्रिपद असल्याने जिल्ह्याची वाट लागली, असेही सोळंके म्हणाले. धनंजय मुंडे सातत्याने माझा संबंध नसल्याचे सांगत राजीनामा देण्याचे कारण विचारीत आहेत. पण वाल्मिकला कुणी पोसले? तो कुणाचा माणूस आहे? धनंजय मुंडे यांच्यामुळेच तो मोठा झाला. आम्हाला हे सगळे दिसते पण आमच्या पक्षनेतृत्वाला हे दिसत नाही, अशी खंत व्यक्त करीत प्रकाश सोळंके यांनी अजितदादांनाही लक्ष्य केले. बीड प्रकरणामुळे सरकारची बदनामी होत आहे. अजितदादा आणि फडणवीसांची देखील बदनामी होत असल्याचे सर्वसामान्य लोकांच्या चर्चेमधून दिसून येते, त्यामुळे त्यांनीही यासंदर्भात विचार करणे गरजेचे असल्याचे मत सोळंके यांनी व्यक्त केले. अवैध धंद्यांना चालना, खंडणीचे प्रकारस वाळू उपसा, राखेचा उपसा, अमाप संपत्ती, हे सगळे पाहून कुणाचेही डोळे फिरतील. धनंजय मुंडे यांना पालकमंत्रिपदाचे सर्वाधिकार दिल्यानेच हे सगळे प्रकार झाले. हीच बाब आम्ही अजितदादांना सांगत होतो. त्यामुळेच धनंजय मुंडे यांना बीडचे पालकमंत्रिपद देऊ नका, अशी विनंती आम्ही अजितदादांना केली होती. सरशेशेवटी अजितदादांनी बीडची जबाबदारी स्वीकारली, याचा आनंद आहे. परंतु धनंजय मुंडे यांना बीडचे पालकमंत्रिपद दिल्यानेच जिल्ह्याची अतिशय वाईट अवस्था झाली हे देखील तितकेच खरे आहे. आताही नैतिकतेच्या मुद्द्यावरून धनंजय मुंडे यांना मंत्रिपदापासून दूर करावे, असा आग्रह सोळंके यांनी धरला. धनंजय मुंडे पाच वर्षांपैकी चार वर्ष बीडचे पालकमंत्री होते. आम्ही त्यांच्या कारभारावर प्रचंड नाराज होतो. खरे तर आताही त्यांच्या मंत्रिपदाविषयी श्रेष्ठींनी निर्णय घ्यायला हवा होता. निकटवर्तीयावर आरोप आहेत. त्याने अमाप संपत्ती निर्माण केली आहे. जबाबदारी स्वीकारून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा हवा. वाल्मिक कराडचा सहभाग दिसला, पण मुंडे यांचा रोल काय असे विचारले जाते तेव्हा वाल्मिक कुणामुळे पुढे आला, हे पक्षश्रेष्ठींना दिसत नाही, असा निशाणा सोळंके यांनी अजित पवार यांच्यावर साधला.

पान १ वरून

## जिल्हा रूग्णालयातील...

हजारों लोकांचा राबता असतो. मात्र जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला टाळे असल्याने नैसर्गिक विधीसाठी कोठे जायचे असा प्रश्न असुन एकवेळ पुरूष समोरच्या पार्किंगच्या जागेत लघुशंकेसाठी जाऊ शकतात मात्र महिलांची शारीरिक आणि मानसिक कुचंबणा होत असुन महिलांची हेळसांड होत असुन तातडीने स्वच्छतागृहे सुरू करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी करत बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना केली असुन सांगा डॉ . अशोक थोरात साहेब सोनोग्राफीसाठी ताटकळत असलेल्या गर्भवती महिलांनी नैसर्गिक विधीसाठी जायचे कोठे? असा सवाल केला आहे. बीड जिल्हा रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) तपासणी व उपचारासाठी रोज एक हजारांहुन आधिक रूग्णांची नोंद असते.सर्व उपचार व तपासण्या मोफत केल्यापासुन रूग्ण संख्येत कमालीची वाढ झाली आहे.आंतररुग्ण ( आयपीडी) विभागात देखील ४०० च्या घरात रुग्ण उपचारासाठी दाखल असतात. या दोन्ही रूग्णांचे नातेवाईक आणि बाह्य रुग्ण विभागात तपासणीसाठी आलेले रुग्ण अशी जिल्हा रुणालयात राबता असलेल्या नागरिकांची संख्या हजारोंच्या घरात आहे.मात्र रूग्णालयाच्या आवारात एकही सार्वजनिक स्वच्छता नाही याचा फटका नातेवाईक महिला व महिला रूग्णांना बसतो. ✻ सोनोग्राफीसाठी ताटकळत बसलेल्या गर्भवती महिलांची हेळसांड : महिला रूग्णांना तज्ञ डॉक्टरांकडून सोनोग्राफीसाठीची तपासणी सुचवल्या नंतर व विशेषतः गर्भवती महिलांना हि तपासणी करण्यासाठी तासं तास ताटकळत थांबावे लागते. सोनोग्राफीकरणा-या तज्ञांची संख्या आणि एकच सोनोग्राफी असल्याने वेळ लागतो. एवढ्या वेळात नैसर्गिक विधीसाठी या महिलांनी जायचे कुठे?? ग्रामीण भागातील आलेल्या महिलांची विशेषतः हेळसांड होत आहे. ✻ सार्वजनिक स्वच्छतागृह लवकरच सुरू करण्यात येईल-डॉ.अशोक थोरात : सदर स्वच्छतागृह लवकरच सुरू करण्यात येईल.तसेच माता व बालसंगोपन रूग्णालयाच्या नवीन बांधलेल्या इमारतींमध्ये खालच्या मजल्यावर मोठे स्वच्छतागृह आहे.त्याचा वापर सुरू करून स्वच्छतागृहाची अडचण सोडवण्यात येईल असे बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी डॉ.गणेश ढवळे यांना आश्वासन दिले.

## लाडक्या बहिणींसाठी...

परिस्थिती चालूच राहणार आहे. काळजी करू नका. फक्त त्याचा लाभ गरजू महिलेला मिळाला पाहिजे. जी व्यक्ती श्रीमंत आहे, टॅक्स भरते, नोकरी आहे, तिचा ऊस चांगला जातो, त्यांच्याबाबत वेगळा विचार करणार आहे. पण ही योजना ज्या मायमाऊलीपर्यंत पोहोचायला हवी होती, त्यांच्यापर्यंत ही योजना पोहोचवण्याचं काम महिला आणि बालविकास विभागाने केलं आहे. परवाच या योजनेसाठी ३७०० कोटींचा चेक महिला आणि बालविकास खात्याला दिला आहे. २६ तारखेच्या आत लाभार्थी महिलांच्या खात्यामध्ये या योजनेचा सातवा हाप्ता जमा होईल असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. दरम्यान अजित पवार यांच्यापूर्वी मंत्री आदिती तटकरे यांनी देखील जानेवारीच्या हाप्त्याबाबत माहिती दिली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# चार दिवसाचं ट्रेनिंग अन् दहावी पास बोगस डॉक्टरने थाटला पंढरपुरात दवाखाना

**पंढरपुर । प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपासून एक दहावी पास महाराज रुग्णांवर मधुमेह आणि हाडांच्या त्रासाबाबत उपचार करत असल्याच्या तक्रारी आरोग्य विभागाला मिळाल्या होत्या. यानंतर बोगस डॉक्टरवर (झेसीं ऊर्ली) कारवाई करण्यात आली आहे. केवळ दहावी पास असलेल्या आणि चार दिवसाचे ट्रेनिंग घेतलेल्या या बोगस महाराजाने थेट जालना (गरश्रपर) येथून येऊन पंढरपुरात दवाखाना थाटला होता. याबाबत माहिती मिळताच आरोग्य विभागाकडून पोलीस आणि नगरपालिका प्रशासनाची मदत घेऊन या दवाखान्यावर धाड टाकली. यावेळी या बोगस डॉक्टरकडून रुग्णांची फसवणूक होत असल्याचे निदर्शनास येताच आरोग्य विभागाने पोलिसांच्या मदतीने पंचनामा केल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश सुडके यांनी दिली आहे. शहरातील जुना अकलूज रस्ता येथील चंद्रभागा बस स्थानकामागे नारायण देव बाबा भक्तनिवास येथे पोलीस व आरोग्य विभागाने धाड टाकली. त्यावेळी दत्तात्रय सदाशिव पवार (रा. जालना) हे शुगर व हाडासंदर्भात त्रस्त असलेल्या रुग्णांवर उपचार करत असल्याचे दिसून आले. त्यावेळी एका व्यक्तीला ५०० रुपये फी आकरल्याची माहिती उपस्थित रुग्णांकडून मिळाली. एका दिवसात अंदाजे ७५ ते ८० रुग्ण उपचारासाठी येत असल्याचे पवार यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांनी पवारांना विचारल्यानंतर त्यांनी शेगाव दुमाला व पंढरपुरात तीन वर्षापासून उपचार करत आहे. रुग्णांवर उपचार करण्याबाबत कोणते ही अधिकृत शिक्षण घेतले नाही. इंडीयन मेडिकल कॉन्सील क्ट १९५६ महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टिशनर क्ट १९६१ चे सर्टीफिकेट नाही. तसेच सातारा येथील एका संस्थेत चार दिवस उपचार करण्याबाबत प्रशिक्षण घेतले, असे सांगितले. यामुळे बोगस डॉक्टरवर कारवाई करण्यात आली असून दवाखाना आता बंद करण्यात आला आहे.

ही कारवाई उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश सुडके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, आरोग्य विस्तार अधिकारी पी. आर. जावळे, नगरपरिषद आरोग्य निरीक्षक नागनाथ तोडकर, पोलीस उपनिरीक्षक भारत वाघ, पोलीस कर्मचारी धनंजय जाधव, प्रवीणकुमार सोनवले, राहुल कांबळे या पथकाने केली.




## पुण्यात अवैध पिस्तुलांचे मध्यप्रदेशात कनेक्शन समोर

## पुणे पोलिसांच्या पुणे शाखेकडून ९ आरोपींसह ७ पिस्टल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात कोयत्याने दहशत माजावणाऱ्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच आता पुण्यातील विविध ठिकाणाहून पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ७ पिस्तूल जप्त केले आहेत. या सर्व ७ पिस्तूल आणि त्यासोबत असलेले जिवंत काडतुसे वापरणाऱ्या ९ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या ९ जणांचे पिस्तूल बाळगण्यासाठीचे अनेक कारणे समोर आली आहेत. काही जणांनी जमिनीच्या वादातून स्वतः चे रक्षण करण्यासाठी पिस्तूल विकत घेतले आहेत, तर काही जणांनी वर्चस्व राहावं यासाठी या पिस्तूल खरेदी केल्याचं तपासातून निष्पन्न झालं आहे.

विशेष म्हणजे हे सर्व पिस्तूल मध्य प्रदेशमधून अगदी कमी किंमतीत आणलं जात असून पुढे याची विक्री लाखो रुपयांमध्ये होते हे सुद्धा समोर आलं आहे. या प्रकरणात सागर ढेबे या तरुणासह इतर ८ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. सागर ढेबेवर याआधी पुण्यातील अनेक पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

## आठवड्यात ७२ तास काम करा म्हणणाऱ्या नारायण मूर्तींच्या इन्फोसिसमध्ये कर्मचाऱ्यांना पगारवाढ, 'इतक्या' टक्क्यांनी वाढले पगार

**मुंबई । प्रतिनिधी**

देशातील आघाडीची आयटी कंपनी असलेल्या इन्फोसिसने त्याच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीकडून यंदा कर्मचाऱ्यांना ६ ते ८ टक्क्यांची वाढ देण्यात येणार आहे. ही वेतनवाढ जानेवारी आणि एप्रिल अशा दोन टप्प्यात देण्यात येणार आहे. या आधी नोव्हेंबर २०२३ मध्ये कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्यात आली होती. काही दिवसांपूर्वी इन्फोसिसच्या नारायण मूर्तींनी कर्मचाऱ्यांना आठवड्यात ७२ तास काम करण्याचा सल्ला दिला होता. इन्फोसिस कंपनीने यंदाच्या आर्थिक वर्षाच्या तिमाहित चांगली महसूल वाढ नोंदवली होती. कंपनीने या काळात ११ टक्क्यांची वाढ नोंदवली असून ६,८०६ कोटी रुपयांचा घसघशीत महसूल कमवला आहे. त्या आधीच्या आर्थिक वर्षाच्यात तिमाहित हा फायदा ६,१०६ कोटी रुपये इतका होता. इन्फोसिसने जाहीर केलेली वेतनवाढ ही दोन टप्प्यात करण्यात येणार आहे. १ जानेवारीपासून जॉब लेव्हल ५ च्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ लागू करण्यात येणार असून ती फेब्रुवारीमध्ये मिळणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यात जॉब लेव्हल ६ च्या कर्मचाऱ्यांना, मार्चपासून वेतनवाढ लागू करण्यात येणार असून ती एप्रिलमध्ये मिळणार आहे.




## अमरावती नागपूर राष्ट्रीय महामार्गावर अपघात; भरधाव कार थेट घरात शिरली

**अमरावती । प्रतिनिधी**

अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या नांदगावपेठ जवळ अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात एक भरधाव कार थेट येथील एका स्थानिक नागरिकाच्या घरात शिरल्याची ही माहिती पुढे आली आहे. मात्र सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झालेली नाही. तर या अपघातानंतर संतप्त नागरिकांनी संताप व्यक्त करत रस्ता अडवून धरला आहे. परिणामी, अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक गेल्या तासभरापासून ठप्प असल्याची माहिती ही पुढे आली आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, अतिक्रमण करून राहणाऱ्या लोकांना घरासाठी जागा देण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. त्यातच आता अपघाताची घटना घडल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत. गेल्या तासभरापासून अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. मात्र आपल्या घराच्या किरकोळ मागणीसाठी नागरिकांनी थेट राष्ट्रीय महामार्ग धरून रोखल्याने प्रवाशांना त्याचा फटका बसला आहे.



## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे स्पोर्ट डे साजरा

**बीड । प्रतिनिधी**



श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे 'स्पोर्ट डे दिनांक १६ जानेवारी २०२५ व १७ जानेवारी २०२५ या दोन्ही दिवशी शाळेमध्ये विविध खेळ घेवून साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष पारगावकर सर, स्नेहा पारगावकर, सचिव पाशा सर मुख्याध्यापक हंसे, उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी आदी महिला पालक आजी-आजोबा विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात गुरुजीच्या पूजनाने आणि मशाल पेटवून करण्यात आली तसेच मुलांची कवायत घेण्यात आली. पूर्व प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी आणि पहिली दुसरीतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट ड्रिल्स सादर केले. खेळाची सुरुवात सांघिक खेळाने करण्यात आली यामध्ये खो-खो कबड्डी व क्रिकेट या खेळांचा समावेश होता यानंतर प्राथमिक व पूर्व प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांचे बलून रेस, कप रेस, बॉटल रेस इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. सर्व स्पर्धा झाल्यानंतर बक्षीस वितरणाचा ही कार्यक्रम घेण्यात आला.सर्व विजयी पालकांना विद्यार्थी आणि आजी-आजोबांना मान्यवरांच्या हस्ते मेडल आणि प्रमाणपत्र देण्यात आले. आपल्या भाषणातून क्रीडा शिक्षक कुडके सर यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व समजावून सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल मॅडम यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्वांनी विशेष परिश्रम घेतले.

## रायगड जि. परिषदेच्या विद्यार्थ्यांची अविष्कार भरारी राष्ट्रीय अविष्कार अभियानातून केली नागपूर भेट

**नागपूर । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आयोजित,केंद्रीय प्रकल्पांतर्गत समग्र शिक्षा २०२४-२५ राष्ट्रीय अविष्कार अभियानाच्या राज्यांतर्गत शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन नागपूर येथील रामण विज्ञान केंद्र व तारामंडळ, नागपूर येथे दि.१५ व १६ जानेवारी, २०१५ दरम्यान करण्यात आले होते.या सहलीसाठी रायगड जिल्हा परिषदेच्या ६ शाळांची निवड करण्यात आली होती ज्यात मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा उपक्रमात जिल्ह्यात प्रथम व विभागात द्वितीय पुरस्कार प्राप्त रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,वडगाव खालापूर, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तळोदे पाचनंद पनवेल, रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,मेढेखार अलिबाग,रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, शेणवई रोहा,रायगड जिल्हा परिषद शाळा, चरई पोलादपूर व रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, नवघर सुधागड या शाळेतील एकूण ४३ विद्यार्थी व श्री.शाम लवंगारे शाळा-चरई,श्रीम.योगिनी वैदू शाळा तळोदे पाचनंद,सौ.शिल्पा सुर्वे शाळा,शेणवई रोहा,सौ.मनीषा अंजर्लेकर शाळा मेढेखार अलिबाग,श्रीम.अनुजा माने शाळा नवघर पाळावी सुधागड या शिक्षकांची निवड करण्यात आली होती. श्री. सुभाष राठोड,शाळा वडगाव यांची या सहलीसाठी जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. सहलीदारम्यान विद्यार्थ्यांना रामण विज्ञान केंद्र व राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन पाहण्याची संधी मिळाली. तारामंडळाची रचना,निर्मिती यावर ३ऊशो दाखवण्यात आला.नागपूर येथील दिक्षा भूमी,ताजबाग,महाराज बाग प्राणिसंग्रहालय सफर अशी विविध प्रेक्षणीय व पर्यटनाचा आनंद मुलांनी लुटला.या कार्यक्रमाच्या प्रमुख मा.पुनीता गुरव शिक्षणाधिकारी प्राथमिक,रायगड जिल्हा परिषद यांनी मुळंचया प्रवासादरम्यान व सहलीदारम्यान सतत संपर्कात राहून सहल यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मार्गदर्शन केले.




**विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टीकोन वृंधीगत करण्यासाठी ही एक पर्वणीच होती.मुलांच्या बौद्धिक विकासासाठी अशा सहलीचे आयोजन महत्त्वाचे आहे. केंद्रीय प्रकल्पांतर्गत चझझझ च्या मार्गदर्शनाखाली सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सर्व मुलांचे व शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन.-पुनीता गुरव शिक्षणाधिकारी प्राथमिक, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

## अत्याचाराला वाच्या फोडण्यासाठी महिलांनी सक्षम व्हावे: पोलीस अधिक्षक कुमात

**अत्याचाराला दुर्लक्षित करू नका. अत्याचाराला विरोध करायला शिका. महिला मेळाव्यात बीड जिल्ह्याचे एस पी नवनीत कावत याचे महिला सुरक्षेसाठी आवाहन मी सदैव तुमच्या पाठीशी राहील ,मुला-मुलींना समान वागणूक द्या**

**सिरसाळा । प्रतिनिधी**

श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय गृहविज्ञान विभाग, फिनिक्स ग्रुप,विशाखा समिती, अं.गु.हमी कक्ष व भाई उद्धवराव पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सिरसाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक नवनीत कावत हे उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, स्त्री-पुरुषातील भेदभाव कमी झाला पाहिजे, समाजात स्त्रियांना मानाचे स्थान मिळावे म्हणून याची सुरुवात आपल्या घरापासूनच करावी. त्यासाठी घरात मुलांना आणि मुलींना समान वागणूक द्या.महिला अत्याचार कमी करायचे असतील तर चांगल्या संस्कारातून ते कमी करता येतील. महिलावरील अत्याचाराची सुरुवात घरातून होते. संस्कारातून ती रुजवली जाते. उदा. मुलींनी सातच्या आत घरात. मुलगा उशिरा आला तरी चालतो. घरकाम मुलींनीच करायचं असतं अशी उदाहरणे देऊन त्यांनी महिलांवर अत्याचार कशा पद्धतीने केले जातात हे अधोरेखित केल. अत्याचाराला दुर्लक्षित करू नका. अत्याचाराला विरोध करायला शिका. महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे आहेत. कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी अत्याचाराला दुर्लक्षित करू नका. छोटे छोटे गोष्टींची नोंद पोलीस स्टेशनला करा. त्यामुळे पोलीस यंत्रणा सतर्क राहून,चुकीच्या मानसिकतेला कायद्याचा धाक निर्माण होण्यास मदत होईल. समानतेचे संस्कार कुटुंबातून व्हावेत. कुटुंब हे संस्काराची पहिली पाठशाळा आहे. समानतेचे संस्कार कुटुंबातून व्हावेत. मुलगा आणि मुलीला समान वागणूक द्या. समान शिक्षण द्या. प्रत्येक क्षेत्रात मुली मुलांपेक्षा सरस असल्याचे दिसून येते. दहावी बारावी मध्ये टक्केवारी मध्ये मुली पुढे असतात. मग पुढे उच्च शिक्षणात मुलींचा टक्का कमी का होतो?.याला कारणीभूत दुय्यम वागणूक आहे. समाजाची मानसिकता आहे. घरातून सुविधा देताना मुलांना झुकत माप असतं.मुलींना दुय्यम वागणूक घरातून दिली जाते. समानतेचे संस्कार कुटुंबातूनच व्हावेत. घराच्या प्रमुखा कडून भेदभाव होऊ नये बरोबर सर्वांना वागणूक द्यायला हवी शिक्षण घेऊन जीवनात स्वतःची ओळख निर्माण झाली तर कुणीही तुम्हाला चॅलेंज करू शकत नाही. तुम्ही सगळे साथ द्या आपण सगळे मिळून बीडचे चित्र बदलून टाकू. महिला सुरक्षेची सुरुवात घरापासून करावी. महिला सुरक्षेचा विषय आपण दररोज पेपरातून वाचतो.केवळ सामाजिक माध्यमातून महिला सुरक्षेच्या चर्चा न होता. महिला सक्षमीकरण: महिला सक्षमीकरण त्याची सुरुवात घरापासून करावी. हे सांगत असताना त्यांनी त्यांच्या आईचे उदाहरण दिले ते म्हणाले की आई आठवी पास होती परंतु लग्न झाल्यानंतर वडिलांनी आईचे पुढील शिक्षण करत उच्चशिक्षित केले.






महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. परळी वै, जि. बीड**

पत्ता: प्रयाग निवास बिल्डींग दुसरा मजला, घरणीकर रोड, महाराष्ट्र ग्रामीण बँक बाजुला, ता. परळी वै. जि.बीड, Email: arparali7@gmail.com

जा.क्र./सनिप/प्रशासन/प्रा.म.यादी/ क वर्ग/कार्यक्रम/२०२५ दिनांक:१७/०१/२०२५

**महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१७ चे नियम ७६ नुसार 'क' वर्गात मोडणाऱ्या सहकारी संस्थांच्या सन २०२५-२०३० करीता होणा-या संचालक मंडळाच्या निवडणूकी**

**प्रारुप मतदार यादी अंतिम करण्याचा कार्यक्रम**

खालील संस्थांच्या प्रारुप मतदार याद्या अंतिम करण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

संस्थेचे नाव :- १. श्री. परळी रिटलेस (गुडस सप्लाय ) को. ऑप क्रेडीट सोसायटी लि. परळी वै. ता. परळी वै, बीड
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. परळी वै, ता. परळी वै, जि.बीड
३. वृक्षवल्ली नागरी सहकारी पतसंस्था मर्या. परळी वै, ता. परळी वै, जि. बीड
४. वैद्यनाथ सहकारी ग्राहक भांडार मर्या. परळी वै, ता. परळी वै, जि. बीड
५. महाराष्ट्र सहकारी ग्राहक भांडार मर्या. परळी वै, ता. परळी वै, जि. बीड

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | २०/०१/२०२५ | सकाळी ११.०० वाजता | संस्था कार्यालय व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. परळी वै यांचे कार्यालय |
| २ | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप हरकत मागविणे | २०/०१/२०२५ ते २७/०१/२०२५ | कार्यालयीन वेळेत | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. परळी वै यांचे कार्यालय **पत्ता :** प्रयाग निवास बिल्डींग दुसरा मजला, घरणीकर रोड, महाराष्ट्र ग्रामीण बँकबाजुला, ता.परळी वै. जि. बीड |
| ३ | प्राप्त हरकती व आक्षेपवर सुनावणी घेणे | ३०/०१/२०२५ | दुपारी २.३० वाजता | |
| ४ | प्रारुप मतदार यादीवरील आक्षेप व हरकती वर निर्णय घेणे | ०७/०२/२०२५ | कार्यालयीन वेळेत | |
| ५ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | ०७/०२/२०२५ | सकाळी ११.०० वाजता | संस्था कार्यालय व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. परळी वै यांचे कार्यालय |

संस्थेच्या कोणत्याही सभासदाने मतदार यादी बाबत कांही दावे किंवा आक्षेप असल्यास किंवा यादीतील नाव, पत्ता, किंवा इतरत तपशील या बाबत कोणतीही हरकत किंवा चूक असल्यास विहित कालावधीत (**सार्वजनिक सुट्टयावगळून**) योग्य त्या पुराव्यानिशी **आक्षेप / हरकत अर्ज तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. परळी वै** यांचे कार्यालयात दाखल करणे आवश्यक आहे. पुराव्याशिवाय दाखल केलेले आक्षेप अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

दिनांक :- /०१/२०२५.
स्थळ :- परळी वै.

**स्वाक्षरित/-**
**(आर.बी. कातळे)**
**तालुका सहकारी निवडणुक अधिकारी**
**तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.परळी वै.**

# शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीसाठी खेळाचे महत्त्व अनन्य साधारण आहे : जिल्हाधिकारी अविनाश पाठक

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे जिल्हा क्रीडा संकुलात महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हाधिकारी शुक्रवारी ( दिनांक १७ रोजी ) बोलत होते . महसूल विभागामार्फत विभागीय स्तरावर जालना येथे १६ , १७ व १८ फेब्रुवारी रोजी स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे . या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाडूंची निवड व्हावी , खेळाडूंचा परिचय व्हावा या उद्देशाने जिल्हास्तरीय महसूल क्रीडा स्पर्धा दिनांक १७ व १८ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आहेत . यावेळी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , अंबाजोगाईचे अपर जिल्हाधिकारी अरविंद लाटकर , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, उपजिल्हाधिकारी ओंकार देशमुख, अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वांजळे, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव , आष्टी पाटोद्याच्या उपविभागीय अधिकारी सीमा शेख



यांच्यासह तहसीलदार चंद्रकांत शेळके , नरेंद्र कुलकर्णी , अविनाश शिंगटे , संदीप खोमणे , संतोष रुईकर , दत्ता निलावाड , राकेश गिड्डे , वैशाली पाटील, विलास तरंगे , सुरेश घोळवे, वैभव महिंद्रकर यांच्यासह त्यांचे अधिनस्त नायब तहसीलदार , अव्वल कारकून , महसूल सहाय्यक , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , ग्राम महसूल सेवक यांच्यासह वाहन चालक , शिपाई इत्यादी उपस्थित होते. सर्वप्रथम दिपप्रज्वलन झाले. त्यांनतर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वजण अनेक क्रीडा प्रकारांची तयारी करत आहोत , आणि विभागीय स्तरावर आपल्या जिल्ह्याला निश्चितच प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे , असे आवाहन केले . खेळाडूंसाठी जिल्हास्तरावरच राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे . त्यामुळे खेळाडूंनी पूर्ण क्षमतेने सराव करावा आणि जिल्ह्यासाठी जास्तीत जास्त योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात बोलताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी घोषित केले की औपचारिक रित्या स्पर्धांचे उद्घाटन झालेले आहे . सर्व क्रीडा प्रकारांमध्ये अधिकारी, कर्मचारी यांनी हिरीरीने भाग घ्यावा , सराव करावा , संस्कृतिक स्पर्धेत भाग घेतलेल्यांनी आपल्या जिल्ह्याचे नाव पुढे कसे येईल यासाठी पुरेपूर प्रयत्न करावेत असे नमूद केले .



*भगवान श्रीकृष्ण इस्कॉन मंदिर माळीवेस बीड येथील भगवंताच्या रथाची बीड शहरामध्ये भव्य मिरवणूक निघाली असता प्रभुजीचे स्वागत करून रथ वाढण्यात आला यावेळी नवनाथांना शिराळे पाटील पत्रकार संजय कुलकर्णी यादवेंद्र प्रभुजी व भक्त मंडळ बीड*

## शेतीमाला संदर्भात महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकारच्या चुकीच्या आयात निर्यात धोरणामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या हतबल : वसंत मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

शेतकऱ्याचा शेतीमाल तयार झाला की परदेशातून शेतीमाल सर्व प्रकारचा आयात करून आपल्या शेतकऱ्यांनी तयार केलेल्या शेतीमालाचे भाव पाडून महाराष्ट्रातील शेतकरी त्रिमूर्ती सरकारने आर्थिक दृष्ट्या कमकुवत केल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. केंद्र व राज्य सरकारचे आयात व निर्यात धोरण शेतकऱ्यासंदर्भात चुकीचे असून गेली चार वर्षापासून शेतीमालाचे भाव हमीभावा पेक्षा कमी दराने खरेदी विक्री होत असल्यामुळे



शासनाचे बाजारपेठेवर नियंत्रण नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवाशी आर्थिक दृष्ट्या खेळ चालू आहे, यावर केंद्र व राज्य सरकारचे नियंत्रण नाही. परदेशातील व्यापाऱ्याकडून संबंधित विभागाच्या प्रमुखाला टक्केवारी दिली जाते व बाजारपेठेतील संपूर्ण भाव पाडले जातात.

## महामार्गावर व्यायामाला जाताना काळजी घ्यावी: सपोनि.गजानन जाधव

**मांजसुंबा । प्रतिनिधी**

पोलीस भरतीची तयारी करणारे विद्यार्थी व युवकांसह वयोवृद्धांनी काळजी घेतली पाहिजे, त्यातून अपघातासारख्या घटना टळू शकतात. शहरातील युवकांनी शक्यतो मैदानावरच व्यायाम करावा. महामार्गावर अपघातामुळे दुर्देवी मृत्यू उद्भवतात त्यामुळे प्रत्येकाने काळजी घेवून शक्यतो मैदान किंवा गावातील रस्त्यावर व्यायाम करावे असे आवाहन स.पो.नि.गजानन जाधव यांनी केले आहे. याबाबत



आवाहन करताना सपोनि.गजानन जाधव यांनी म्हटले आहे की, गेल्या काही वर्षात रस्ते अपघाताचे प्रमाण चिंताजनक वाढले आहे. वाहतूकीच्या नियमांचे पालन सर्वच वाहन चालक करताना दिसत नाही. अशा काळात वयोवृद्ध व युवकांनी महामार्गालगत व्यायाम करताना योग्य ती काळजी घ्यावी. शक्यतो महामार्गावर व्यायाम करणे टाळावे. जेणेकरुन अपघातासारख्या घटना टळू शकतात. महामार्ग पोलीस जनतेच्या सेवेत तत्पर आहेत असेही सपोनि.गजानन जाधव यांनी नमूद केले आहे.

## विजय साळवे यांना मूकनायक माजलगाव भूषण पुरस्कार जाहीर



**माजलगाव । प्रतिनिध**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रात समाजातील अनिष्ट चालीरीती प्रथा परंपरांमुळे बहुजन मुक्या समाजाला चांगले ऐकण्याचा शिक्षणाचा एवढेच नव्हे तर बोलण्याचा सुद्धा अधिकार नव्हता त्या काळामध्ये या मुख्य समाजाला बोलते करण्यासाठी मूकनायक नावाचे वृत्तपत्र ३१ जाने. १९२०साली सुरू केले होते , त्याचेच औचित्य साधून माजलगाव येथील निर्भिड पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा आणि मानाचा असा सामाजिक कार्याबद्दल मूकनायक माजलगाव भूषण पुरस्कार ज्येष्ठ नेते व सामाजिक कार्यकर्ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष विजयदादा साळवे यांना जाहीर झाला असून भव्य अशा मोठ्या सोहळ्यामध्ये हा पुरस्कार देण्यात येणार आहे गेल्या अनेक वर्षापासून शिव फुले शाहू आंबेडकर विचाराला पुढे घेऊन जाण्यासाठी व तमाम मानवतावादी विचारांच्या महापुरुषांच्या विचाराला समाजात रुजविण्यासाठी अहोरात्र झटणारे व आंबेडकरी चळवळीतील दलित पँथरच्या काळापासून अगदी विद्यार्थी दशे पासून झटणारे विजयदादा साळवे यांना मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. निर्भीड पत्रकार संघ गेल्या काही वर्षांपासून मूकनायक व माजलगाव भूषण पुरस्काराचे आयोजन अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने करीत आहे , त्याचाच एक भाग म्हणून यावर्षीचा मूकनायक माजलगाव भूषण पुरस्कार ज्येष्ठ नेते विजय दादा साळवे यांना जाहीर झाला.

## युसूफ वडगाव पोलीसांची कामगिरी ; अवैध ट्यांगो संत्रा दारू पकडली



**केज । प्रतिनिधी**

युसुफ वडगाव पोलीस ठाणे हद्दीत मौजे बनसारोळा येथे एका बोलेरो जीप मधून टँगो संत्रा दारूची वाहतूक होत असल्याबाबत माहिती मिळाली होती. सदर माहितीवरून युसुफ वडगाव पोलिसांनी सदर जीपची तपासणी केली असता सदर जीपमध्ये १७,५००/- किमतीची टँगो संत्रा देशी दारू अवैधपणे वाहतूक करत असताना चैतन्य बाबासाहेब रांजणकर, रा. युसुफ वडगाव हा मिळून आला. त्याच्यावरती युसुफ वडगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करून अवैध पद्धतीने विकली जाणारी दारू व दारू वाहतुकीसाठी वापरली गेलेली बोलेरो जीप असा एकूण २,१७,५००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

तसेच पोउनि बसवेश्वर चनशेट्टी व इतर अंमलदार हे युसुफ वडगांव पोलिस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना आवसगाव शिवारात केलेल्या वाहन तपासणी मध्ये मुजफ्फर गफार तांबोळी, रा. केज हा त्याचेकडील स्विफ्ट डिझायर गाडीत विमल, बाओबाजी, गोवा, आरएमडी असा १२५८५/- रू. किंमतीचा प्रतिबंधीत गुटखा विक्री साठी वाहतूक करताना आढळून आला. सदर इसमास २,१२,२८५/- रू चे मुद्देमाल व कारसह घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. दसदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली युसूफ वडगाव पोलीस ठाण्याचे सपोनी मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोउपनि बसवेश्वर चनशेट्टी, पोलीस शिपाई बालासाहेब घोरपडे, पोलिस शिपाई नितीन अतकरे पोलीस शिपाई महादेव केदार, चालक पोलीस शिपाई सादीक आतार यांच्या पथकाने केली आहे.

## पालकमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अजितदादा पवार यांचा डॉ.योगेश क्षीरसागरांकडून सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड झाली. त्याबद्दल पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सत्कार केला. बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेच्यावतीने अजितदादा पवार यांचे अभिनंदन केले. त्यांचा प्रशासनातील दांडगा अनुभव व कणखरपणा बीड जिल्ह्याला प्रगतीपथावर घेवून जाण्यास नक्की मदत करेल, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेने पकडला: पाच घरफोडया केल्याचे उघड

**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई उपविभागातील दाखल होणाऱ्या चोऱ्या,घरफोडयाचा संमातर तपास करुन आरोपीचा शोध घेवुन गुन्हयातील गेला माल हस्तगत करणे बाबत आदेश वरीष्टांनी दिल्याने गोपनिय बातमीदारामार्फतीने माहीती काढुन कुख्यात सराईत दरोडेखोर हा त्याने चोरलेले सोने विकण्यासाठी परळी मध्ये येत असल्याची माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सापळा रचुन मोठया शिताफीने कुख्यात दरोडेखोर मोहन दौलत मुंडे, रा.क्रांती नगर, अंबाजोगाई यास अशोक नगर कमानीजवळ झडप मारुन पकडले. त्याचे जवळ विकण्यासाठी आनलेले सोन्याचे दागीणे आढळुन आले त्यास परळी व अंबाजोगाई येथे झालेल्या घरफोडी बाबत चौकशी केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यानंतर त्यास अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांने ०५ घरफोडया केल्याचे प्राथमिक



चौकशीअंती निष्पन्न झाले असुन त्यांनी पाच दिवसा घरफोडया केल्याचे कबुल केले आहे, त्याचे ताब्यातुन पोलीस ठाणे परळी ग्रामीणचे ०२ गुन्हे, पोलीस ठाणे परळी शहर ०१ गुन्हा, पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण ०१ व पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर ०१ असे असुन ०५ दिवसा घरफोडीचे गुन्हे उघडकीस आनले आहे. त्याचे ताब्यातुन एकुण १२२ ग्रॅम सोने जवळपास आजचे बाजारभाव ९,००,०००/- रु मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपी व मुद्देमाल पोलीस ठाणे परळी ग्रामीण यांचे ताब्यात पुढील तपासकामी देण्यात आला आहे. सदरील आरोपी हा दारु पिण्याचे व जुगार खेळण्याचे सवईचा असुन तो दारुच्या नशेत बंद घर पाहुन कुलुप तोडुन आत मध्ये प्रवेश करुन सोने, नगदी चोरुन नेतो व मिळालेल्या पैशातुन दारु पितो व जुगार खेळतो. आरोपी मोहन दौलत मुंडे याचेवर दिवसा घरफोडीचे अनेक गुन्हे दाखल आहेत.तो पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. सदरील कारवाई हि श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे,यांनी केली आहे.

# शासनाच्या हमीभाव खरेदी केंद्रावर बारदाना अभावी सोयाबीन खरेदी केंद्र बंद

## केज तालुक्यातील शेतकरी चिंतेत ; शेतकऱ्यांवर संकट ; अल्पदराने खाजगी केंद्रावर सोयाबीन विक्रीची वेळ

**केज । प्रतिनिधी**

राज्य सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभावाने खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्र उपलब्ध करून दिले. ऑनलाइन नोंदणी पूर्ण झाल्या. बारदाना उपलब्ध नसल्याने सोयाबीन खरेदी केंद्र बंद आहेत. खरेदी केंद्र कधी सुरू होणार म्हणून शेतकरी चिंतेत आहेत. तात्काळ खरेदी केंद्र सुरू करा अशी मागणी केली जात आहे.

**खरेदी केंद्रावर चार दिवसात बारदान उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहोत अशी माहिती डीडीआर श्री वाजपेयी यांनी दिली.**

तालुक्यात चिंचोली माळी, होळ ,बनसारोळा, नांदुरघाट ही राज्य सरकारची अधिकृत हमीभाव खरेदी केंद्र आहेत. युसूफवडगाव येथील खरेदी केंद्र हे महाकिसन संघाचे आहे. वडगाव येथील खरेदी केंद्राने स्वतः बारदाना खरेदी करून खरेदी चालू ठेवलेली आहे तर इतर खरेदी केंद्रात खरेदी बंद आहे. शासनाकडे वारंवार मागणी करूनही बारदान उपलब्ध होत नाही. ऑनलाइन नोंदणी करून शेतकरी चकरा मारत आहेत. प्रति सोयाबीन खरेदी केंद्राकडे दोन ते अडीच हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली आहे. खाजगी खरेदी केंद्रावर बाजार भाव ४१५० आहे तर शासनाने जाहीर केलेला हमीभाव ४८९२ रुपये आहे. शेतकरी नोंदणी करून मॅसेज ची वाट बघत आहेत तर मॅसेज आलेल्या शेतकऱ्यांनाही बारदाना उपलब्ध नसल्याने खरेदी केंद्र बंद असल्याचे सांगितले जाते. एकीकडे ३१ जानेवारीपर्यंत खरेदी पूर्ण करण्याच्या सूचना राज्य सरकारने दिले आहेत आणि अद्याप खरेदी केंद्र सुरूच नाहीत यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे.

सोयाबीन मळणी करून अडीच महिन्याचा कालावधी उलटून गेला माल विक्रीसाठी तयार आहे. मात्र शासन धोरण हे कुचकामी ठरत आहे शेतकऱ्यांनी खाजगी सावकार ,उदार देणारे कृषी दुकानदार विविध ठिकाणावरून उदारीवर घेतलेले खते बियाणं याचे या पैशाचा तागाता सुरू आहे. हमीभाव केंद्र केवळ नावालाच आहेत. शेतकऱ्यांना नाईलाजाने सोयाबीन खाजगी व्यापाऱ्यांकडे विक्री करावी लागत आहे. खाजगी व्यापारी कमी भावाने सोयाबीन खरेदी करून शेतकऱ्यांची लूट करत आहेत.

**नोंदणी करून महिना होऊन गेला अद्याप अजून मॅसेज आलेला नाही. कृषी दुकानदार लोकांची उसनवार परत करण्यासाठी पैशाची आवश्यकता आहे मात्र सोयाबीन विकणार कधी ? शासनाचे हमीभाव केंद्र केवळ नावालाच आहेत का ? – शेतकरी संतोष गायकवाड**